१६ नवशक्ति
मुंबई, शनिवार, २० मे २०१७
अर्थशक्ति

## 'वर्ल्ड ट्रेड डे' निमित्त निर्यात वाढीसाठी राज्यभर विविध कार्यक्रमाचे आयोजन

मुंबई, शुक्रवार (वृत्तसंस्था) – 'वर्ल्ड ट्रेड डे'चे निमित्त घेऊन महाराष्ट्राची निर्यात क्षमता वाढविण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे. महाराष्ट्रातील विविध भागात त्यानिमित्ताने कालपासून २७ मे पर्यंत अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. हे सर्व कार्यक्रम ऑल इंडिया असोसिएशन ऑफ इंडस्ट्रीज, अंबड इंडस्ट्रीज अँड मॅन्युफॅक्टरर्स असोसिएशन, वर्ल्ड ट्रेड सेंटर –पुणे, विदर्भ इंडस्ट्रीज असोसिएशन, चेंबर ऑफ मराठवाडा इंडस्ट्रीज अँड अॅग्रिकल्चर (सीएमआयए) आणि कोल्हापूर इंजिनिअरिंग असोसिएशन यांच्या संयुक्त पुढाकाराने भरविण्यात आले आहेत. एखाद्या राज्याची निर्यातक्षमता वाढविण्यासाठी उपयोजिलेला 'वर्ल्ड ट्रेड डे'–महाराष्ट्र हा भारतामधील एक अनोखा कार्यक्रम आहे. अशाप्रकारचा 'वर्ल्ड ट्रेड डे' महाराष्ट्रामधील मुंबई, नाशिक, पुणे, नागपूर, औरंगाबाद आणि कोल्हापूर या शहरांमध्ये साजरा केला जाणार आहे. निर्यात क्षेत्रात अतुलनीय कामगिरी करणाऱ्यांचा यावेळी सन्मान करण्यात येणार आहे.

प्रहार | मुंबई
शुक्रवार, १९ मे २०१७

## वर्ल्ड ट्रेड डे महाराष्ट्रची सुरुवात

**मुंबई** – वर्ल्ड ट्रेड डेचे निमित्त घेऊन महाराष्ट्राची निर्यात क्षमता वाढविण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे. महाराष्ट्रातील महत्त्वूपर्ण भागात त्यानिमित्ताने १८ ते २७ मे दरम्यान विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. हे सर्व कार्यक्रम ऑल इंडिया असोसिएशन ऑफ इंडस्ट्रीज, अंबड इंडस्ट्रीज अँड मॅन्युफॅक्टरर्स असोसिएशन, वर्ल्ड ट्रेड सेंटर -पुणे, विदर्भ इंडस्ट्रीज असोसिएशन, चेंबर ऑफ मराठवाडा इंडस्ट्रीज अँड अॅग्रिकल्चर (सीएमआयए) आणि कोल्हापूर इंजिनिअरिंग असोसिएशन यांच्या संयुक्त पुढाकाराने भरविण्यात आले आहेत. हा उपक्रम नवउद्योजक, मध्यम उद्योजक, आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये सहभागी असणाऱ्या कंपन्या, उदयोन्मुख निर्यातदार, लॉजिस्टिक सेवा पुरविणाऱ्या कंपन्या, सल्लागार, बँकर्स, महिला उद्योजिका आदींना लाभदायी ठरणार आहे. आंतरराष्ट्रीय व्यापाराबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याने इच्छुक मंडळी आपापल्या आवडीनुसार त्यामध्ये सहभागी होऊ शकतील. या उपक्रमाशी निगडीत असलेली मंडळी आपापली माहिती वेबसाईटवर नोंदवू शकतील.

# राज्यभर साजरा होणार 'वर्ल्ड ट्रेड डे-महाराष्ट्र'

। मुंबई : 'वर्ल्ड ट्रेड डे'चे निमित्त घेऊन महाराष्ट्राची निर्यात क्षमता वाढवण्याचे उद्दिष्ट ठरवण्यात आले आहे. महाराष्ट्रातील महत्त्वपूर्ण भागात त्यानिमित्ताने १८ ते २७ मेदरम्यान विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. हे सर्व कार्यक्रम ऑल इंडिया असोसिएशन ऑफ इंडस्ट्रीज, अंबड इंडस्ट्रीज अँड मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन, वर्ल्ड ट्रेड सेंटर-पुणे, विदर्भ इंडस्ट्रीज असोसिएशन, चेंबर ऑफ मराठवाडा इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चर (सीएमआयए) आणि कोल्हापूर इंजिनीयरिंग असोसिएशन यांच्या संयुक्त पुढाकाराने भरवण्यात आले आहेत.

एखाद्या राज्याची निर्यातक्षमता वाढवण्यासाठी उपयोजिलेला 'वर्ल्ड ट्रेड डे-महाराष्ट्र' हा देशामधील एक अनोखा कार्यक्रम आहे. अशाप्रकारचा 'वर्ल्ड ट्रेड डे' महाराष्ट्रामधील मुंबई, नाशिक, पुणे, नागपूर, औरंगाबाद आणि कोल्हापूर या शहरांमध्ये साजरा केला जाणार आहे. या सर्व शहरांची निर्यातीची क्षमता मोठी आहे. एक आठवडा चालणाऱ्या या महोत्सवामुळे महाराष्ट्र तसेच भारतामधील आर्थिक विकासाशी संबंधित असलेल्या आंतरराष्ट्रीय व्यापाराचे महत्त्व वृद्धिंगत होणार आहे. आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे केवळ आर्थिक वृद्धीलाच चालना मिळत नाही, तर रोजगारांच्या संधी वाढणे, चांगले शिक्षण, पायाभूत तसेच नागरी सुविधांमध्येही सुधारणा होते. 'वर्ल्ड ट्रेड डे'चे आयोजन स्थानिक भागामधील आंतरराष्ट्रीय व्यापाराचे महत्त्व ओळखण्यासाठी जगभरातील वर्ल्ड ट्रेड सेंटर आणि इतर व्यवसाय प्रसिद्धी संस्थांकडून केले जाते. सध्या जगभरातील एकूण व्यापारामध्ये भारताचे प्रतिनिधित्व १.९४ टक्के एवढे आहे. भारताकडून होणाऱ्या एकूण निर्यातीमध्ये महाराष्ट्राचा वाटा २५ टक्क्यांएवढा आहे. भारताची निर्यातक्षमता वाढवण्यामध्ये महाराष्ट्र राज्य भविष्यात मोठी भूमिका निभावू शकते. 'वर्ल्ड ट्रेड डे'च्या या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे वेगवेगळ्या विषयांवर चर्चासत्रे आयोजित करण्यात आली आहेत. निर्यात क्षेत्रात अतुलनीय कामगिरी करणाऱ्यांचा या वेळी सन्मान करण्यात येणार आहे. तसेच आंतरराष्ट्रीय व्यापारासंबंधातील एका पुस्तकाचेही या वेळी प्रकाशन केले जाणार आहे.

Publication : Mumbai News Network

Link : http://mumbainewsnetwork.blogspot.in/2017/05/mvirdc-world-trade-centre-mumbai.html?q=MVIRDC+World+Trade+Centre+Mumbai+Announces+World+Trade+Day+Maharashtra

Publication : Bullet Daily News

Link : http://bulletdailynews.blogspot.in/2017/05/mvirdc-world-trade-centre-mumbai.html

Publication : Mumbai News Network

Link : http://mumbainewsnetwork.blogspot.in/2017/05/india-must-take-advantage-of-lull-in.html?q=India+must+take+advantage+of+lull+in+TPP+and+TTIP+to+improve+competitiveness

Publication : Telegraphindia

Link : https://www.telegraphindia.com/pressrelease/nv/59581/noel-n-tata-felicitated-for-tata-internationals-outstanding.html

Publication : UNI India

Link : http://www.uniindia.com/noel-tata-felicitated-for-tata-international-s-outstanding-performance/business-economy/news/875843.html

publication : Auto news press

Link : http://www.autonewspress.com/noel-n-tata-felicitated-tata-internationals-outstanding-performance-international-trade/

Publication : Bureaucracytoday

Link : https://bureaucracytoday.com/corporate_world_news.aspx?id=92529

# Media Coverages in Nashik

TODAY नाशिक शहर

सकाळ
नाशिक, मंगळवार
२३ मे २०१७
५

**रिलायन्स फाउंडेशनतर्फे श्री साईबाबा संस्थानला रुग्णवाहिका**

**नाशिक :** रिलायन्स फाउंडेशनतर्फे शिर्डी येथील श्री साईबाबा संस्थानला १७ लाख ४८ हजार रुपये किंमत असलेली फोर्स कंपनीची कार्डियाक रुग्णवाहिका व एलएमएल लिमिटेड (कानपूर) यांनी एक लाख दहा हजार रुपये किंमत असलेली श्रीव्हीलर वाहनाची देणगी दिली. या दोन्ही वाहनांची पूजा संस्थानचे अध्यक्ष डॉ. सुरेश हावरे यांच्या हस्ते करण्यात आली. या वेळी संस्थानचे उपाध्यक्ष चंद्रशेखर कदम, विश्वस्त सचिन तांबे, विश्वस्त तथा नगराध्यक्षा योगिता शेळके, कार्यकारी अधिकारी रुबल अग्रवाल, उपकार्यकारी अधिकारी डॉ. संदीप आहेर, सूर्यभान गमे, उत्तम गोंदकर, दिलीप उगले, अशोक औटी व वैद्यकीय संचालक डॉ. विजय नरोडे आदी उपस्थित होते.

# निर्यात क्षेत्रात येऊन उद्योगाची प्रगती करा

## राधाकृष्णन बी. : आयमात एक्स्पोर्ट ओरिएटेशन व प्रमोशनवर चर्चासत्र

**सकाळ वृत्तसेवा**

नाशिक, ता. २२ : उद्योजकांनी एका उद्योगावर अवलंबून न राहता निर्यात क्षेत्रात येऊन आपल्या उद्योगाची प्रगती करावी. तसेच स्किल्ड डेव्हलपमेंटचा वापर करून रोजगार वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत. त्यासाठी आयमाने पुढाकार घ्यावा. उद्योगांना जिल्हा प्रशासनातर्फे सर्वतोपरी मदत केली जाईल, असे जिल्हाधिकारी राधाकृष्णन बी. यांनी दिले.

उद्योजकांना आपल्या उत्पादनाची निर्यात परदेशात करताना सुलभ व सोयीस्कर जावे, उद्योजकांनी आपल्या उत्पादनाची निर्यात करताना येणाऱ्या समस्या तत्काळ सोडविता याव्यात, तसेच निर्यात करणाऱ्यांना उद्योजकांना वेगवेगळ्या योजनांचा लाभ मिळावा, त्याविषयी मार्गदर्शन मिळावे, याकरिता आयमा व वर्ल्ड ट्रेड सेंटर (मुंबई) यांच्या संयुक्त विद्यमाने एक्स्पोर्ट ओरिएटेशन व प्रमोशनवर आयमा रिक्रिएशन सेंटर येथील के. आर. बुब कॉन्फरन्स हॉलमध्ये आज चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. त्या वेळी ते बोलत होते.

व्यासपीठावर वर्ल्ड ट्रेड सेंटरचे ॲडव्हायझर ए. यू. कुरुविला, अरविंद खेडकर, आयमाचे अध्यक्ष राजेंद्र आहिरे, उपाध्यक्षा नीलिमा पाटील, एक्स्पोर्ट कमिटीचे अध्यक्ष एन. डी. ठाकरे, सेमिनार कमिटीचे अध्यक्ष धनंजय दीक्षित, एक्स्पोर्ट-इम्पोर्ट असोसिएशनचे अध्यक्ष रमेश पवार आदी उपस्थित होते. अध्यक्ष आहिरे यांच्या हस्ते मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. नीलिमा पाटील यांनी प्रास्ताविकात 'आयमा'च्या कार्याविषयी माहिती दिली. आयात-निर्यात संघटनेचे अध्यक्ष रमेश पवार यांनी वर्ल्ड ट्रेड सेंटरच्या कार्याविषयी माहिती दिली. श्री. कुरुविला यांनी उद्योजकांनी वर्ल्ड ट्रेड सेंटरच्या सुविधा व योजनांचा लाभ घेऊन आपला निर्यात व्यापार वाढवावा, असे आवाहन केले. एक्स्पोर्ट कमिटीचे अध्यक्ष एन. डी. ठाकरे यांनी नाशिकच्या उद्योजकांना निर्यातीसाठी मोठा वाव आहे, त्यांचा फायदा व मार्गदर्शन होण्यासाठी आजच्या सेमिनारचे आयोजन करण्यात आल्याचे सांगितले.

याप्रसंगी वर्ल्ड ट्रेड सेंटरचे अरविंद खेडकर यांनी निर्यातीसंदर्भात उद्योजकांना मार्गदर्शन करून आपला निर्यात व्यापार कशाप्रकारे वाढवावा, यासंबंधी माहिती दिली. या वेळी उद्योजकांनी निर्यातीसंदर्भात सदस्यांचे त्यांच्याकडून निराकरण करून घेतले. तसेच निर्यात करणाऱ्या उद्योजकांना संपूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन सिडबी व एक्झीम बँकेच्या अधिकाऱ्यांनी दिले. सेमिनार कमिटीचे अध्यक्ष धनंजय दीक्षित यांनी सूत्रसंचालन केले. या वेळी आयमाचे दिलीप वाघ, अनिल ढिंगरे, एन. डी. ठाकरे, अविनाश मराठे, जगदीश पाटील, वर्ल्ड ट्रेड सेंटरच्या रूपा नाईक व विनिता घुगे आदींसह उद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### लघु-मध्यम उद्योजकांचा सन्मान

**वर्ल्ड ट्रेड डेच्या निमित्ताने इंजिनिअरिंग क्षेत्रात उत्कृष्ट निर्यात करणाऱ्या पांचाल इंजिनिअर्स इंडिया, टेक्नोफ्लो ग्रिन इक्विपमेंट्स, अल्फाटेक प्रोसेस इक्विपमेंट्स, श्री लक्ष्मी इंजिनिअरिंग, अनिष फार्मा इक्विपमेंट्स, टेक्नोशेल ऑटोमेशन्स, रविराज इंडस्ट्रिज, ऑरचिड सायंटेफीक ॲण्ड इनोव्हेटीव्ह इंडिया प्रा. लि. या उद्योगांना जिल्हाधिकारी राधाकृष्णन बी. यांच्या हस्ते पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले.**




**नाशिक : आयमा व वर्ल्ड ट्रेड सेंटर (मुंबई) यांच्या संयुक्त विद्यमाने एक्स्पोर्ट ओरिएटेशन व प्रमोशन संदर्भात सोमवारी आयोजित चर्चासत्रात सन्मानित करण्यात आलेल्या उद्योजकांबरोबर जिल्हाधिकारी राधाकृष्णन बी., ए. यू. कुरुविला, अरविंद खेडकर, राजेंद्र आहिरे, नीलिमा पाटील, एन. डी. ठाकरे, धनंजय दीक्षित, रमेश पवार आदी.**

# उद्योजकांनी निर्यात क्षेत्रात येऊन उद्योगाची प्रगती साधावी : बी. राधाकृष्णन

## एक्सपोर्ट ओरिएंटेशन व प्रमोशनवर आयमात चर्चासत्र

अंबड - उद्योजकांनी एकाच उद्योगावर अवलंबून न राहता, निर्यात क्षेत्रात येऊन आपला उद्योग वाढवावा. स्किल्ड डेव्हलपमेंटचा वापर करून रोजगार वाढविण्यासाठी प्रयत्न करावा, त्याकरिता आयमासारख्या संस्थेने पुढाकार घेऊन उद्योजकांना मदत करावी. तसेच उद्योजकांना जिल्हाधिकारी कार्यालयाकडून सर्वतोपरी मदत केली जाईल, असे आश्वासन जिल्हाधिकारी बी. राधाकृष्णन यांनी दिले. आयमा येथे वर्ल्ड ट्रेड डेनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी उद्योजकांना आपल्या उत्पादनाची निर्यात परदेशात करताना सुलभ व सोईस्कर व्हावे, त्यांच्या समस्या तसेच निर्यातदार उद्योजकांना विविध योजनांचा लाभ कसा मिळेल, याकरिता मार्गदर्शन करण्यात आले. तसेच वर्ल्ड ट्रेंड डेनिमित्त उत्कृष्ट निर्यातदार उद्योजकांना जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

याप्रसंगी व्यासपीठावर बी. राधाकृष्णन, वर्ल्ड ट्रेड सेंटरचे ॲडवायझर ए. यू. कुरुविला, अरविंद



खेडकर, आयमाचे अध्यक्ष राजेंद्र अहिरे, उपाध्यक्ष नीलिमा पाटील, एक्स्पोर्ट कमिटीचे अध्यक्ष एन. डी. ठाकरे, सेमिनार कमिटीचे अध्यक्ष धनंजय दीक्षित, एक्स्पोर्ट इम्पोर्ट असोसिएशनचे अध्यक्ष रमेश पवार आदी उपस्थित होते. आयमा अध्यक्ष अहिर यांनी मान्यवरांचा सत्कार केला. यावेळी वर्ल्ड ट्रेड सेंटरचे खेडकर यांनी निर्यातीसंदर्भात उद्योजकांना मार्गदर्शन करून स्लाइड शोद्वारे मार्गदर्शन केले. यात पॅकिजिंग, परफॉर्मन्स, प्रॉस्पेक्ट, प्रॉडक्टिव्हिटी प्रॉफिटॅबिलिटी याद्वारे निर्यातीत वाढ होण्याबाबत माहिती दिली. वर्ल्ड ट्रेड डेनिमित्त इंजिनीयरिंग क्षेत्रातील उत्कृष्ट निर्यातदार लघु व मध्यम उद्योगातील उत्कृष्ट कार्य व निर्यातदार पांचाल इंजिनीयर्स इंडिया प्रा. लि., टेक्नोफ्लो ग्रीन इक्विपमेंट्स प्रा. लि., अल्फाटेक प्रोसेस इक्विपमेंट्स प्रा. लि., अनिष फार्मा इक्विपमेंट्स प्रा. लि., टेक्नोशेल ऑटोमेशन प्रा. लि., रविराज इंडस्ट्रीज, ऑर्चिड सायंटिफिक ॲण्ड इनोव्हेटिव्ह इंडिया प्रा. लि. आदी उद्योगांना जिल्हाधिकारी बी. राधाकृष्णन यांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

सेमिनार कमिटीचे अध्यक्ष धनंजय दीक्षित यांनी सूत्रसंचलन केले, तर वर्ल्ड ट्रेंड सेंटरचे ॲडवायझर कुरुविला यांनी आभार मानले. याप्रसंगी वर्ल्ड ट्रेंड सेंटरच्या रूपा नाईक, विनिता घुगे, आयमाचे दिलीप वाघ, अनिल डिंगरे, एन. डी. ठाकरे, अविनाश मराठे, जगदीश पाटील आदींसह उद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महत्त्वाचे

### सिन्नर तालुक्यातील ९५ हातपंप बंद

### पाच गावे, दोन वाड्या-वस्त्यांना टँकरने पाणी

### शेतकऱ्यांना कर्जमुक्ती देण्याची मागणी

इगतपुरी : सोने-चांदीच्या दागिन्यांसह रोख रक्कम लांबवली

# साडेसात लाखांची धाडसी घरफोडी

लोकमत न्यूज नेटवर्क



## इगतपुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

### पिंपळगावी माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

लोकमत न्यूज नेटवर्क

# सुकेणेला जोडणाऱ्या रस्त्यांचा बोजवारा

वाहनचालक हैराण : तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी

लोकमत न्यूज नेटवर्क

## सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष



या रस्त्यांची झाली दुर्दशा..



### सिन्नर येथे राजा राममोहन रॉय जयंती

लोकमत न्यूज नेटवर्क

# उद्योजकांनी निर्यात क्षेत्रात प्रगती साधावी

बी. राधाकृष्णन : आयमा व वर्ल्ड सेंटर, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने बैठक

लोकमत न्यूज नेटवर्क

# दुसऱ्या रेल्वेमार्गामुळे शेतकऱ्यांत संभ्रम

लोकमत न्यूज नेटवर्क



## रेल्वेमार्गाचे सर्वेक्षण

# झोडगेजवळ अनधिकृत क्रॉसिंग

लोकमत न्यूज नेटवर्क

फेऱ्या बंद : सायखेडा-नाशिक बस अनियमित असल्यामुळे प्रवाशांमध्ये नाराजी

# बसेसचे वेळापत्रक कोलमडल्याने संताप

लोकमत न्यूज नेटवर्क




# CLASSIFIEDS

गुंतवणूक

कर्जविषयक

नोकरीविषयक

पाहिजेत

Canada Australia Work permit + PR

No Advance. Gulf Return

Govt. Approved Co.

9115123910, 9115123904

छोट्या-मोठ्या जाहिरातींसाठी अरविंद राठी 14, मनोरमा आर्केड, M:98220 67652 M:94239 67392

छोट्या जाहिराती मोठ्या करामती